**"सर्वांसाठी परवडणारी घरे" या योजने अंतर्गत मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.१०.२०११ रोजी सायंकाळी ४.३० वा. त्यांच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

"सर्वांसाठी परवडणारी घरे" या योजने अंतर्गत समिती सदस्यांची बैठक मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.१०.२०११ रोजी सायं.४.३० वा. त्यांच्या समिती कक्षात संपन्न झाली. या बैठकीला खालील प्रमाणे निमंत्रीत उपस्थित होते.

१.श्री. गौतम चॅटर्जी, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय.
२.श्री. सुबोध कुमार, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
३.श्री. टी.सी. बेंजामिन, प्रधान सचिव , नगरविकास विभाग (नवि १),मंत्रालय.
४.श्री.एस.एस.झेंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.
५. श्रीमती वत्सला सिंह, सचिव, पर्यावरण विभाग.
६.श्री. एसव्हीआर श्रीनिवास, आयुक्त, एम.एम.आर.डी. ए .
७.श्री.प्रविण दोषी, अध्यक्ष, होम्स फॉर ऑल.
८.श्री. पारस गुंडेचा, सदस्य.
९.श्री. धर्मेश जैन, सदस्य.
१०. श्री. नैनेश शहा, सदस्य.
११.श्री. दिपक गरोडिया, सदस्य.
१२.श्री. संदीप रुणवाल, सदस्य.
१३. श्री. एस. आर. मर्चंट, सदस्य .
१४. श्रीमती मेघा शेंडे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

सभेच्या सुरुवातीस श्री. रत्नाकर गायकवाड, मुख्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर सभेस सुरुवात होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय | निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १. | मुंबई उपनगरामध्ये ०.३३ अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करुन देण्याबाबत. | मा.मुख्य सचिवांनी या संदर्भात असे नमुद केले की, प्रशासकीय पातळी वर करावयाची कार्यवाही पूर्ण झाली असून प्रस्ताव शासन स्तरावर मान्यते साठी सादर करण्यात आला आहे. त्या बाबत नगरविकास विभागामार्फत पाठपुरावा करण्यात यावा. मुख्य सचिव स्वतः तसेच प्रधान सचिव (नवि १ ) हे या प्रकरणी पाठपुरावा करणार आहेत. | नगरविकास विभाग |
| २. | हाय राईज कमिटी निकष | हाय राईज कमिटी समोर ७० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारतींचे प्रस्ताव सादर करावेत अशी मागणी | नगरविकास विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | हाय राईज कमिटी | MCHI मार्फत करण्यात आली आहे. प्रत्यक्षात नवीन आदेशाप्रमाणे केवल स्लेंडर प्रमाण हाच निकष असून १:९ या प्रमाणात प्रस्ताव असल्यास हाय राईज कमिटीकडे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही असे प्रधान सचिव (नवि१) यांनी स्पष्ट केले. त्या परिस्थितीत १५० मीटर पेक्षा जास्त उंचीच्या इमारतींसाठी देखील हायराईज कमिटी कडे जावे लागणार नाहीअसे बैठकीत सांगण्यात आले. हाय राईज कमिटीच्या प्रस्तावांसाठी तपासणी सूची असावी असेमुख्य सचिवांनी एमएमआरडीए ला सांगितले. अशी तपासणी सूची या पूर्वीच तयार करण्यात आली असल्याचे एमएमआरडीए कडून सांगण्यात आले. | MCHI / बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ३. | एक खिडकी योजना | रेंटल हाऊसिंगसाठी एक खिडकी योजना राबविण्यात यावी अशी मागणी MCHI मार्फत करण्यात आली . यासाठी तपासणी सूची तयार करावी असे मुख्य सचिवांनी सुचित केले.या संदर्भातील अनेक प्रस्ताव ULC मधून सूट मिळण्यासाठी प्रलंबित असल्याचे MCHI मार्फत सांगण्यात आले.ULC अंतर्गत सूट मिळण्याच्या अधीन राहून आशय पत्र निर्गमित करावे असे MCHI ने सूचित केले. त्यास बैठकीत तत्वतः सहमती दर्शविण्यात आली. या प्रकरणी अधिकारांचे विकेंद्रीकरण करता येईल काय या बाबत तपासणी करावी असे मुख्य सचिवांनी सुचित केले. | नगरविकास विभाग /बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ४. | वि.नि.नि. ३३(५) अन्वये २.५चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करुन देण्याबाबत. | वि.नि.नि. ३३(५) अन्वये कोकण विभागात २.५चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करावा अशी विनंती MCHI मार्फत करण्यात आली.या संदर्भात कार्यवाही सुरु आहे असे बैठकीत सांगण्यात आले आहे. | |
| ५. | पर्यावरण विषयक केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मान्यता | केंद्रीय स्तरावरील पर्यावरणीय मान्यता दर्शविणाऱ्या समितीचे काम | पर्यावरण विभाग |

२३/१.६१

| | | | |
|---|---|---|---|
| | | अत्यंत धिम्या गतीने चालते आणि समितीचा दृष्टीकोन सकारात्मक नाही असे बैठकीत सांगण्यात आले. ही कार्यपध्दती सुलभ करण्यासंदर्भात केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला मुख्य सचिव स्तरावर पत्र पाठविण्यात यावे असे बैठकीत ठरले. | |
| ५. | आपोआप बिनशेती परवानगी (Automatic N.A.) | मुंबईमध्ये अकृषिक परवानग्या एका महिन्यात अथवा आपोआप देण्यात याव्यात असे बैठकीत ठरले. मुंबई उपनगर जिल्हयामध्ये अकृषिक परवानग्या देण्याबाबत कोणतीही अडचण येत नसल्याचे MCHI मार्फत सांगण्यात आले. | |

पुढील बैठक दि.१५.११.२०११ रोजी वा त्या सुमारास आयोजित करण्यास मा.मुख्य सचिवांनी सहमती दर्शविली व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

*************